ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख १८ जुलै, १९५६ अंक २९

## विविध माहिती

**अमेरिकेंत बेकारी पसरली**— अमेरिकेच्या पोलादाच्या कारखान्यांतील कामगारांनीं वेतनवाढीसाठीं पुकारलेला संप अद्याप चालू आहे. सुमारें ६,५०,००० कामगार संपावर असल्या-मुळें पोलादाच्या निर्मितींत घट झाली आहे. पोलादावर अवलंबून असलेल्या इतर धंद्यांतहि आतां बेकारी पसरूं लागली आहे. ह्या इतर धंद्यांतील ५०,००० कामगारांना नोटिसा मिळाल्या आहेत.

**गुजरातमधील छोटीं बंदरें**— सुरत, भडोच, खंबायत आणि ओखा ह्या गुजरातमधील छोट्या बंदरांची सुधारणा करण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. बिलिमोरिया येथील बंदरांतहि सुधारणा करण्याचें काम पूर्ण झालें आहे. ह्या कामासाठीं सुमारें ३·५ लाख रुपये खर्च आला.

**जर्मन तज्ज्ञांचें आगमन**— भारतामधील खनिज तेलाच्या उत्पादनासंबंधीं सल्ला देण्यासाठी सरकारनें पश्चिम जर्मनींतील कांहीं तज्ज्ञांना पाचारण केलें होतें. सरकारच्या विनंतीप्रमाणें तीन जर्मन तज्ज्ञ नोव्हेंबरमध्यें भारतांत येणार आहेत. ते भारताचा तीन महिने दौरा करतील. त्यांच्या जाण्या-येण्याचा व पगाराचा खर्च जर्मन सरकार सोसणार आहे.

**हातानें बनविलेल्या बुटांना मागणी**—रशिआनें भारता-कडे हातानें बनविलेल्या ६,००,००० बुटांच्या जोड्याची मागणी केली आहे. हा सर्व माल बहुधा आग्रा येथील चर्मकारांकडून पुरविला जाईल. बुटाचे तीन डझन जोड नमुन्यासाठीं मास्कोला आधींच पाठविण्यांत आले आहेत. रशिआ व भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारी कराराप्रमाणें ही निर्यात करण्यांत येत आहे.

**मद्रास सरकारला कर्ज**—रासायनिक खतें विकत घेण्यासाठी भारतीय सरकारनें मद्रास सरकारला ३७,८०,००० रुपयांचें अल्पमुदतीचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून मद्रास सरकार १२,००० टन अमोनिअम सल्फेट विकत घेऊन त्याचें वांटप करणार आहे. कर्ज १८ महिन्यांत परत करावयाचें असून, त्यावर ३½ टक्क्यानें व्याज घेण्यांत येणार आहे.

**लोकसंख्येबद्दल इषारा**—बर्मिंगहॅम विद्यापीठांत अर्थशास्त्राचें अध्यापन करीत असलेले प्रोफेसर वुड्स ह्यांनीं असा इषारा दिला आहे कीं जगाची लोकसंख्या सध्यांप्रमाणें वाढत गेल्यास ९०० वर्षांनीं माणसाला फक्त उभे रहाण्यापुरतीच जागा मिळेल. उष्ण कटिबंधांतील लोकसंख्या दरहजारीं ४० नें वाढत आहे. उलटपक्षीं, मृत्यूचें दरहजारीं प्रमाण मात्र १० पर्यंत खालीं आणतां येईल, अशीहि माहिती त्यांनीं सांगितली.

**३,६८० अंबर चरखे**—ओरिसा राज्याच्या खादी व ग्रामोद्योग बोर्डाची बैठक नुकतीच भरली होती. बोर्डानें ३,६८० अंबर चरखे विकत घेऊन ते सूत कातणाऱ्यांना पुरविण्याचें ठरविलें. त्यांपैकीं १,००० चरखे ओरिसाच्या बाहेरून खरेदी करण्यांत येणार असून बाकीचे राज्यांतील औद्योगिक शाळांतून करवून घेण्यांत येणार आहेत.

**भारतभर पायी प्रवास**—श्री. मुकर्जी नांवाचे एक गृहस्थ गेलीं १० वर्षें भारताच्या निरनिराळ्या भागांत पायी प्रवास करीत आहेत. त्यांनीं आतांपर्यंत ६७,००० मैलांवर प्रवास केला आहे. त्यांचें वय ३९ वर्षांचें आहे. अंगावर किंमती कपडे नसल्यामुळें डाक बंगले व सार्वजनिक बांधकाम खात्याचे बंगले ह्यांच्या रक्षकाकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा अनुभव त्यांनीं सांगितला आहे.

**बंदरांच्या विकासासाठीं**—मुंबई राज्यांतील दुय्यम प्रती-च्या बंदरांचा विकास करण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ३८ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. अशा ३० बंदरांची सुधारणा करण्यांत येणार आहे. मार्गदर्शक दिवे, बोटी लावण्यासाठीं धक्के, इत्यादि कामावर पैसा खर्च करण्यांत येईल. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अपुरीं राहिलेलीं कामें पूर्ण करण्यासाठीं ४० लाख रुपये खर्च होतील.

**संशोधन संस्थेचें सहकार्य**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या कालावधींत निघणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांना सल्ला-मसलत देण्यासाठीं चार अमेरिकन औद्योगिक अर्थशास्त्रज्ञ भारतांत येणार आहेत. अमेरिकेंतील स्टॅनफर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे त्यांना पाठविण्यांत येणार आहे. भारतीय सरकार-च्या उद्योग व व्यापार खात्याबरोबर ह्यासंबंधीं करार करण्यांत येणार आहे.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—भारतांत कच्ची फिल्म तयार करण्याचा उद्योगधंदा काढणें कितपत शक्य आहे तें अजमावून पहाण्यासाठी पूर्व–जर्मनींतील कांहीं तज्ज्ञ भारताचा दौरा करून गेले होते. त्यांनीं आपला अहवाल आतां मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. हा धंदा काढणें दक्षिण भारतांतील शहरांतूनच शक्य आहे, असें त्यांचें मत आहे.

**नवा कर बसविण्याची सूचना**—नाशिक म्युनिसिपालिटीनें मलेरिआ–कर बसवावा अशी सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या डायरेक्टरनें केली आहे. घरपट्टीच्या प्रत्येक रुपयामागें १ पैसा ह्या दरानें कराची आकारणी केली तर १०,००० रुपये कर गोळा होईल. ह्या पैशाचा उपयोग करून आरोग्यासाठीं घरांतून जंतुघ्न द्रव्यांचा शिडकाव करण्यांत येईल.

## चार्टर्ड बँकेच्या अधिकारांत वाढ
## इंग्लंडच्या राणीचा नवा चार्टर

इंग्लंडच्या राणीनें "चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना"ला नवीन सनद् दिली आहे. ह्यापूर्वी प्रत्येक वेळीं ३० वर्षांची सनद दिली जात असे; आतांची सनद कायम स्वरूपाची आहे. नव्या सनदीप्रमाणें, त्या बँकेला जगांत कोठेंहि शाखा उघडतां येतील; अर्थात् ज्या देशांत ती उघडावयाची तेथील सरकारची मंजुरी लागेलच. ह्यापूर्वी, बँकेला केप ऑफ गुड होपच्या पूर्वेकडील ठिकाणींच फक्त शाखा उघडण्याची परवानगी होती. बँकेला ब्रिटिश सरकारच्या संमतीनें स्वतःचें नांव बदलतां येईल.

## बुद्धाच्या दांताचा शोध

नागपूरच्या आसपास कोठेंतरी बुद्धाचा एक दांत पुरला गेलेला असावा, असें बुद्धविषयक वाङ्मयावरून दिसून येतें. हा दांत शोधून काढण्यासाठीं नागपूर विद्यापीठानें प्रयत्न करावा, असें सुचविण्यांत आलें. त्याला अनुसरून, विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौंसिलनें हें संशोधन करणाऱ्याला दरमहा २५० रु. देण्यांत यावे, अशी शिफारस केली. निवडलेल्या माणसाला प्रथम तीन महिने पुराणवस्तुसंशोधन खात्यांत शिक्षण दिलें जाईल. विद्यापीठाची अखेरची मान्यता अद्याप मिळावयाची आहे.

## मध्यप्रदेशांतील सहकारी साखर कारखाना

मध्यप्रदेशांत बैतुल किंवा बिलासपूर जिल्ह्यांत सहकारी साखर कारखाना स्थापण्यांत येणार आहे. त्यासाठीं पहाणीचें काम सुरू झालें आहे.

## आचार्य विनोबा भावे

आचार्य विनोबा भावे हे सध्यां तामीलनाडमध्यें दौरा करीत आहेत. २१ जुलैपासून ते सकाळीं व संध्याकाळीं ६ मैल चालतील व ऐकाऐवजीं दोन खेड्यांना दररोज भेट देतील, असें त्यांनीं प्रकट केलें आहे.

## जंगल खात्याला उत्पनाची नवी बाब.

मद्रास सरकारच्या जंगल खात्यानें आपल्या नियमांत दुरुस्ती करून, संरक्षित जंगलांत चित्रपटांचें शूटिंग करणाऱ्या कंपन्यांकडून परवाना फी घेण्याची तरतूद केली आहे. एका दिवसाच्या शूटिंगला १०० रु., पहिल्या १५ दिवसांचे १,००० रु. व त्यापुढें दिवसाला १०० रु., असे दर ठरविण्यांत आले आहेत.

## उसाच्या पिकाचा अंतिम अंदाज

भारतांत १९५५-५६ मध्यें ४४,४६,००० एकर विभागांत उसाची लागवड झाली असावी व त्यामध्यें ५,७७,४९,००० टन ऊंस पिकला असावा असा अधिकृत अंदाज आहे. गेल्या वर्षापेक्षा यंदा लागवडीच्या क्षेत्रांत ४,५९,००० एकरांनीं किंवा ११·३ टक्क्यांनीं आणि उत्पादनांत ८,२६,००० टनांनीं किंवा १·५ टक्क्यानें वाढ झाली.

## संस्थेस मंत्र्याचें नांव नको

पाकिस्तानांतील कोणत्याहि संस्थेस गव्हर्नर, मध्यवर्ती किंवा प्रांतिक मंत्री अथवा त्यांच्या पत्नी, ह्यांचें नांव देण्यांत येऊं नये, असा हुकूम पाकिस्तान सरकारनें काढला आहे. अध्यक्ष मात्र त्याचें नांव देण्याला एकाद्या संस्थेस संमति देऊं शकेल.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

भांडवल

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी वगैरे | रु. | ८,७५,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ६,५०,००,०००चे वर |

स्पेशल सेव्हिंग्ज योजना

★ जुलै १९५६ पासून स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिटची योजना सुरू झाली आहे. व्याजाचा दर दोन टक्के.


★ रु. दहा हजारावरील रकमा तीन महिने व अधिक मुदतीसाठी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

अधिक माहितीसाठी चौकशी करावी.

मुख्य कचेरीः–
थोरले बाजीराव
रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
बी. कॉम., एफ्. आय्. बी. (लंडन)
मॅनेजर.

किर्लोस्कर
शेंगायंत्रें



या यंत्राकडून दर तासाला ७५ ते ८० पोतीं शेंगा फोडली जात असून ते चालविण्यास ६ ते ८ अश्वशक्ति लागते. या शिवाय लहान प्रमाणावर हातानें व पॉवरवर चालणारीं यंत्रें मिळतात.

सविस्तर माहितीसाठी लिहा.

"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी

# अर्थ

बुधवार, ता. १८ जुलै, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकसंख्या आणि अन्नपुरवठा

जगाची लोकसंख्या व अन्नपुरवठा ह्यांचा तुलनामक विचार केला, तर भारताची त्यासंबंधांतील परिस्थिति अधिक बिघडलेली नाहीं, असें दिसून येईल :—

**जगाची लोकसंख्या व अन्नाचें उत्पादन**

| वर्ष | जगाची लोकसंख्या | | भारताची लोकसंख्या | | जागतिक अन्न-उत्पादनाचा इंडेक्स नंबर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी | इंडेक्स नंबर १३४८ = १०० | कोटी | इंडेक्स नंबर १९४८ = १०० | १९३४–३८ = १०० | १९४८ = १०० |
| १९४८ | २३५ | १०० | ३४ | १०० | ११२ | १०० |
| १९५२ | २४६ | १०५ | ३६ | १०७ | १२६ | ११३ |
| १९५३ | २४९ | १०६ | ३७ | १०९ | १३० | ११६ |
| १९५४ | २६५ | ११३ | ३८ | ११० | १२९ | ११५ |

भारतांतील अन्नउत्पादनाची वाढ कशी होत गेली हें खाली दर्शविलें आहे :—

| वर्ष | धान्याच्या उत्पादनाचा इंडेक्स नंबर १९४९–५० = १०० |
|---|---|
| १९४९–५० | १००·० |
| १९५०–५१ | ९०·५ |
| १९५१–५२ | ९१·१ |
| १९५२–५३ | १०१·१ |
| १९५३–५४ | ११८·४ |
| १९५४–५५ | ११२·२ |

वरील आंकडे असें दर्शवितात, कीं जगाच्या लोकसंख्येच्या मानानें भारताची लोकसंख्या वाढलेली नाहीं, आणि अन्नाचा पुरवठा लोकसंख्येच्या वाढीच्या मागें पडलेला नाहीं. अर्थात्, हें घडून आलें, त्याचें श्रेय कोणीहि घ्यावें किंवा कोणालाहि द्यावें !

जगांतील सर्वांत दाट वस्तीचे देश खालीलप्रमाणें आहेत :—

चीन (५८ कोटी), भारत (३८ कोटी), यू. एस्. एस्. आर. (२१ कोटी), जपान (९ कोटी), इंडोनेशिया (८ कोटी) आणि पाकिस्तान (८ कोटी).

भारतांतील लोकसंख्येच्या प्रश्नाचा खरा बिकटपणा जननाचें मोठें प्रमाण हा नसून, वाढत्या लोकसंख्येला चरितार्थाचें साधन मिळवून देणें हा आहे. सहाजिकच, जननाचें प्रमाण कमी करण्याच्या मार्गाचा अवलंब क्रमप्राप्त होतो; नाहीं तर क्रयशक्तींत वाढ न होतां वाटेकरी मात्र वाढतात. भारतांतील औद्योगिक व शेतीचें उत्पादन शक्य तेवढें वाढविण्याच्या प्रयत्नाचें रहस्य हेंच आहे.

## पगाराचें मान : कमाल प्राप्तीवर मर्यादा

राज्यसभेंत, स्टेट बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टराच्या भारी पगारावर बरीच टीका होऊन, त्यांतून त्या अधिकाऱ्याचा राजीनामा निष्पन्न झाल्याचें वाचकांच्या माहितीचें आहेच. व्यापार व कारखानदारी ह्यांत अद्याप पुरेसे लायक व तज्ज्ञ अधिकारी उपलब्ध नाहींत. सरकार आतां सरकारी क्षेत्राची वाढ करीत असल्यामुळें, खाजगी क्षेत्रांतील अधिकारी सरकारी नोकरींत जातील. त्यांना मिळणारें वेतन पुरेसें आकर्षक नसेल तर त्याचे काय परिणाम होतील, ह्याकडे लक्ष पुरविलें जाणें अगत्याचें आहे.

अमेरिकेंत खाजगी उद्योगधंद्यांतील लोकांना किती मोठ्या प्रमाणांत प्राप्ति होते, हें खालील माहितीवरून दिसून येईल.

दिलेले आंकडे वार्षिक प्राप्तीचे आहेत.

| | रु. |
|---|---|
| ‘ जनरल मोटर्स ’चे अध्यक्ष : | ३६,९५,६६४ |
| ‘ बेथलेहॅम स्टील ’चे अध्यक्ष : | ३३,६०,१९३ |
| ‘ जनरल मोटर्स ’च्या बोर्डाचे चेअरमन : | ३३,३९,२५९ |
| ‘ ड्यू पाँट ’चे अध्यक्ष : | ३०,५८,८६६ |
| ‘ क्राइसलर कॉर्पोरेशन ’चे अध्यक्ष : | २३,८३,३३२ |
| ‘ कोलंबिया ब्रॉडकास्टिंग ’चे अध्यक्ष : | १३,९८,७५९ |
| ‘ कोलंबिया ब्रॉडकास्टिंग ’चे डायरेक्टर : | १५,०४,१६० |
| ‘ कोलंबिया ब्रॉडकास्टिंग ’चे चेअरमन : | ११,४९,६६४ |
| ‘ आर. सी. ए. ’चे अध्यक्ष : | ९,५२,००० |

“ बिझिनेस वीक ” ह्या न्यूयॉर्कच्या पत्रानें केलेल्या पहाणीचा हा निष्कर्ष आहे. १३२ कंपन्यांच्या ४८० अधिकाऱ्यांच्या प्राप्तीची पहाणी केली, त्यांत ६५% (२६०) लोकांना दरवर्षी ४,७६,००० रु. पेक्षा जास्त किंवा दरमहा ३९,६६७ रु. पेक्षा अधिक पगार होता, असें दिसून आलें.

### क्रिकेटपटु ‘ सर ’ झाला

इंग्लंडचा भूतपूर्व क्रिकेट कप्तान, लेन हटन, ह्याला गेल्या आठवड्यांत ‘ सर ’ हा किताब मिळाला. ह्यापूर्वी, डोनाल्ड ब्रॅडमन, जॅक हॉब्स, पेल्हॅम वॉर्नर व स्टॅन्ले जॅक्सन ह्यांना हा मान मिळालेला आहे. राणीनें बकिंगहॅम राजवाड्यांत, त्याच्या प्रत्येक खांद्यावर उघड्या तरवारीनें स्पर्श करून त्याला सन्मान-पूर्वक किताब दिला. त्यानंतर तिनें सर लेन हटनशीं थोडा वेळ क्रिकेटच्या खेळासंबंधीं बातचीत केली.

### ऑटोमॅटिक मागांसाठी अर्ज मागविले

भारत सरकारनें ४,६०० नव्या ऑटोमॅटिक मागांना परवानगी देण्याचें ठरविलें आहे. त्यावर होणारें उत्पादन निर्गत केलें पाहिजे, ही अट मात्र पाळण्यांत आली पाहिजे. त्यापैकी जें उत्पादन स्थानिक बाजारपेठेंत विकण्यांत येईल, त्यावर दंडादाखल दर चौरस वारास किमान २ आणे जकात बसविली जाईल. सरकारनें ३५० गिरण्यांकडून हे नवे माग बसविण्यासाठी अर्ज मागविले आहेत.

## काजूंचें उत्पादन वाढविण्याची योजना

इंडिअन कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें भारतामधील काजूंचें उत्पादन वाढविण्याची योजना तयार केली आहे. संस्थेशीं विचारविनिमय करून त्रावणकोर–कोचीन राज्य सरकारनें ह्या धंद्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी ३८ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. सुमारें २७,००० एकर जमिनींत काजूच्या पिकाची नव्यानें लागवड करण्यांत येणार असून जरूर तें बियाणें पुरविण्यासाठी तीन केंद्रेंहि स्थापन करण्यांत येतील. सध्या त्रावणकोर–कोचीन राज्यांत ८५,००० एकर जमिनींत काजूंची लागवड करण्यांत येते. एवढ्या लागवडी-पासून दरसाल सुमारें ४३,००० टन काजूंचें उत्पादन होतें. त्रावणकोर–कोचीन राज्यांत काजूंचे कारखाने बरेच आहेत. परंतु त्या सर्वांना पुरेल इतकें उत्पादन मात्र होत नाहीं. त्यामुळें नियमित पुरवठा होण्यासाठी कारखान्यांना पुष्कळदां पूर्व–आफ्रिकेतून आयात करण्यांत येणाऱ्या काजूंवर अवलंबून रहावें लागतें. इंडिअन कौंसिलनें मद्रास राज्याच्या किनाऱ्यावरील ५०,००० एकर जमिनींत आणि पूर्व किनाऱ्यावरील ६०,००० एकर जमिनींत काजूंची लागवड करण्याचें ठरविलें आहे. सध्या मद्रास राज्यांत ३९,००० एकर जमिनींत काजूंची लागवड केली जाते. एकूण उत्पादन सुमारें २९,००० टन होतें. भारता-मधील काजूंच्या एकूण लागवडीपैकीं ८० टक्के जमीन मद्रास, त्रावणकोर–कोचीन व दक्षिण कॅनरा ह्या राज्यांत आहे. पण उत्पादन सुमारें ८५,००० टन असून तें काजूंच्या कारखान्यांना ६ महिने पुरेल इतकेंच आहे. त्यामुळें आणखी तितकेंच काजू पूर्व–आफ्रिकेतून आयात करावे लागतील.

---

## राजस्थानमधील सहकारी संस्था

राजस्थान सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सहकारी संस्थांची वाढ करण्याचें ठरविलें आहे. सहकारी संस्थांच्या स्थापनेची व त्यांच्या कार्याची व्याप्ति वाढविण्याची स्वतंत्र योजनाच आंखण्यांत आली आहे. दुसऱ्या कार्यक्रमाच्या कालावधींत राज्यांत ५०० मोठ्या सहकारी पतपेढ्या स्थापन करण्यांत येतील. १६ नव्या मध्यवर्ती सहकारी बँका उघडण्यांत येतील. सध्या काम करीत असलेल्या को–ऑपरेटिव्ह बँकेच्या बळकटीकडे अधिक लक्ष पुरविण्यांत येईल आणि एका सेंट्रल को–ऑपरेटिव्ह मॉर्टगेज बँकेचीहि स्थापना करण्यांत येईल. त्याशिवाय प्राथमिक स्वरूपाच्या मार्केटिंग संस्था स्थापन करण्यांत येऊन त्यांच्या कार्यावर लक्ष ठेवणारी मध्यवर्ती मार्केटिंग सोसायटीहि उभी करण्यांत येईल. मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या सहकारी शेतीविषयक पतपेढ्यांच्या उपयोगासाठी १५० गुदामें बांधण्यांत येतील आणि प्राथमिक स्वरूपाच्या मार्केटिंग सोसायट्यांच्या उपयोगासाठी वेगळी ३० गुदामें बांधण्यांत येतील. मालाच्या साठवणीसाठी ज्या वखारी बांधण्यांत यावयाच्या आहेत, त्या बांधण्यासाठी वेअर हौसिंग कॉर्पोरेशन काढण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनच्या उभारणीसाठी २·६८ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकीं १·८ कोटी रुपयांची रक्कम रिझर्व्ह बँकेकडून कर्जाऊ मिळणार आहे. ह्या रकमेचा विनियोग सहकारी पतपेढ्यांचें भाग–भांडवल विकत घेण्यासाठी राज्य सरकारनें करावयाचा आहे. उरलेली रक्कम राज्यसरकारनें व मध्यवर्ती सरकारनें उभी करावयाची आहे.

---

## पश्चिम जर्मनीची चमत्कारिक आर्थिक परिस्थिति

पश्चिम जर्मनींतील आर्थिक परिस्थिति चमत्कारिक झाली आहे आणि त्यामुळें अर्थशास्त्रज्ञांत जोराचा वाद चालू झाला आहे. पश्चिम जर्मनींतील उद्योगधंदे भरभराटीच्या शिखरावर असल्यानेंच गोंधळ उत्पन्न झाला आहे. जर्मनीवर ह्या पूर्वी आर्थिक संकटें आलीं होतीं, त्यांचें स्वरूप वेगळें होतें. पुरेशी निर्यात करण्यासाठी जर्मनीला इतर औद्योगिक राष्ट्रांशीं तीव्र स्पर्धा करावी लागली होती. 'निर्यात करा नाहींतर मरा' हें जर्मनीचें घोषवाक्यच बनलें होतें. पण आज अगदीं उलटा उपदेश जर्मनींतील कांहीं अर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. निर्यात कमी करण्याचा सल्ला ते देत आहेत. निर्यात कमी केली नाहीं तर परदेशीय चलन आणि सोनें ह्यांचा लोंढाच देशांत येईल आणि चलनवृद्धि बेलगाम होण्याची शक्यता निर्माण होईल अशी भीति त्यांना वाटत आहे. पण निर्यात कमी न करण्याचा सल्लाहि कांहीं अर्थशास्त्रज्ञ देत आहेत. आज जर्मनींत सोनें, परदेशीय चलन आणि सरकारनें बसविलेल्या करांची शिलकी रक्कम ह्यांनीं उच्चांक गांठला आहे. ह्या सर्व बाबी मिळून २,००० कोटी मार्कस् पेक्षाहि अधिक रक्कम जर्मन सरकारजवळ पडून आहे, आणि तिचें काय करावें ह्यांची पंचाईत पडूं लागली आहे. आज जर्मनीजवळचा सोन्याचा सांठा ब्रिटनपेक्षाहि अधिक आहे. आणखी परदेशीय चलन व सोनें देशांत येणें धोक्याचें वाटूं लागलें आहे. जर्मनींतील भरभराटीमुळें किंमती वाढत गेल्या आणि आज जर्मन मार्कची किंमत १९५० च्या मानानें २२ टक्के कमी झालेली आहे. १९३९ सालीं जर्मनींत जेवढें चलन वापरांत होतें त्याच्या दुप्पट आज वापरांत आहे. पण त्यावेळीं जर्मनीची लोकसंख्या २० टक्क्यांनीं अधिक होती.

---

## रशिआच्या वाढत्या उत्पादनाची भीति

अमेरिकेंतील रुटजर्स विद्यापीठातर्फे इंटर नॅशनल बँकिंग समर स्कूल नांवाची एक संस्था चालविण्यांत येते. ह्या संस्थेचें ९ वें अधिवेशन न्यूयॉर्क येथें भरलें असतांना अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यांतील एक वरिष्ठ अधिकारी मि. रॉबर्ट बॉई ह्यांनीं रशिआच्या वाढत्या उत्पादनाबद्दल अमेरिकेला इषार दिला आहे. मि. बॉई म्हणाले कीं, पुढील वीस वर्षांच्या कालांत रशिआचें आणि त्याच्या गटांतील राष्ट्रांचें उत्पादन पाश्चिमात्य राष्ट्रगटापेक्षा अधिक होईल अशी भीति वाटण्यास जागा आहे. ह्या वाढलेल्या उत्पादनामुळें जगांतील सत्तेचा तराजू आपणाकडे झुकेल असा अंदाज रशिआंतील राज्यकर्ते करीत आहेत. सध्यांच्या परिस्थितीकडे पाहिलें तर असें दिसतें कीं रशिअन राष्ट्रगटाचें एकूण उत्पादन अमेरिकेच्या उत्पादनाच्या निम्म्यापेक्षा थोडेसेंच अधिक आहे. तथापि रशिअन राज्यकर्त्यांची अशी अपेक्षा आहे कीं त्यांच्या गटाची आर्थिक प्रगति होऊन उत्पादन झपाट्यानें वाढत जाईल. रशिआनें आतांपर्यंत केलेल्या प्रगतीकडे दुर्लक्ष करणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. इंटर नॅशनल बँकिंग समर स्कूल ह्या संस्थेच्या अधिवेशनाला पश्चिम युरोपच्या आर्थिक घडामोडींत भाग घेणारे प्रमुख तज्ज्ञ उपस्थित असतात. त्याचप्रमाणें पुष्कळदां कम्युनिस्ट राष्ट्रगटाच्या बँकिंगच्या व्यवसायांतील प्रतिनिधींहि हजर असतात. ह्या वर्षी रशिआंतील बँकिंगच्या धंद्याचे ९ प्रतिनिधी आलेले होते. रशिआच्या स्टेट बँकेचे उपाध्यक्ष हेहि हजर होते. त्याशिवाय अमेरिकेंतील मॉर्गन रॉथशील्ड व चेस बँकिंग संघटनांचे प्रतिनिधींहि अधिवेशनास आलेले होते.

---

## चेक लिहितांना लक्षांत ठेवण्याच्या बाबी

(१) बँकेनें पुरविलेल्या चेकचा उपयोग करावा. खाडाखोड लवकर लक्षांत यावी, ह्या दृष्टीनें तो मुद्दाम तयार केलेला असतो.

(२) चेक शाईनें, ठळक अक्षरांत व ठळक आकड्यांत लिहावा. पेन्सिलीचा, टाइपरायटरचा किंवा 'बॉल पॉइंट' चा उपयोग करूं नये.

(३) डाव्या बाजूला खेटून रक्कम लिहिण्यास प्रारंभ करावा. शब्दांत जागा सोडूं नये. रुपये ह्या शब्दाला सोडूनच रक्कम लिहावी; जणूं काय तो एकच लांब शब्द आहे.

(४) रकमेचा आकडा लिहिण्यासहि डाव्या बाजूस खेटून करावा. रुपये, आणे व पै ह्यांमधील जागा आडव्या रेघेनें भरून काढावी. उदाहरणार्थ, रु. ३१-४-५.

(५) मूळ चेक तसा छापला नसेल, तर तो 'ऑर्डर' करावा. शक्य तो 'बेअरर' चेक देऊं नये.

(६) चेक पोस्टानें पाठविणें असेल, तर तो 'क्रॉस' करावा व त्यावर 'नॉट निगोशिएबल' असें लिहावें. रकमेच्या आकड्यांतून क्रॉसिंगच्या रेघा ओढूं नयेत. ज्याला चेक द्यावयाचा त्याच्या बँकेचें नांव माहीत असल्यास तेंहि लिहून 'स्पेशल क्रॉसिंग' करावें.

(७) आणखी दक्षता हवी असेल, तर द्यावयाच्या चेकवर "......रुपयापेक्षा अधिक नाहीं" असें लिहावें.

(८) कोऱ्या चेकवर सही करून देऊं नये.

(९) चेक लिहिल्यावर त्यांत दुरुस्ती करावयाची असेल, तर तेथें संबंध सही करावी. चेक काढणारे (ड्रॉवर्स) एकापेक्षा अधिक असतील, तर त्या सर्वांची सही हवी.

(१०) प्रत्येक चेकवर ठराविक पद्धतीनेंच, बँकेकडे नमुना दिल्याप्रमाणें सही करावी.

(११) आकड्यांतील व शब्दांतील रक्कम जुळत आहे, हें नीट पहावें.

(१२) ज्यांच्या नांवें चेक काढावयाचा ('पेयी') त्याचें नांव बिनचूक लिहावें. चेक कंपनीच्या नांवें काढावयाचा असेल तर कंपनीचें संबंध नांव लिहावें. 'पेयी' चें नांव व 'ऑर ऑर्डर' किंवा 'ऑर बेअरर' ह्या शब्दांत जागा सुटूं देऊं नये.

(१३) बँकेंत अनेक खातीं असतील, तर ज्या खात्यांतून पैसे काढावयाचे त्या खात्याचें नांव सहीजवळ लिहावें.

(१४) चेकबुक बंदिस्त जागीं कुलूप लावून ठेवावें.

(१५) नवीन चेकबुक मागतांना बँकेनें पुरविलेला फॉर्म वापरावा.

(१६) दुसऱ्याच्या चेकबुकांतील चेक घेऊं नका.

(१७) चेक बुकांतून चेक फाडण्यापूर्वी, डाव्या बाजूची काउंटर फॉइल लिहून पुरा करा.

(१८) चेक गहाळ झाला तर बँकेला कळवून, त्याची रक्कम न देण्याची सूचना करा. मागाहून गहाळ चेक सांपडला, तर तात्काळ बँकेला कळवा.

---

**बोटी बुडवून कर्ज कमी केलें**—दुसऱ्या महायुद्धांत अमेरिकेनें रशिआला मदत म्हणून कांहीं बोटी उधार-उसनवार दिल्या होत्या. त्यांतील ५६ बोटी, अमेरिकेच्या नाविक प्रतिनिधीला बोलावून त्याच्यादेखत जुन्या म्हणून बुडविण्यांत आल्या. ज्या बोटी वापरतां येण्यासारख्या असतील त्यांचीच किंमत देण्याचा करार असल्यानें ह्या मार्गानें रशिआनें ५ कोटी डॉलर्सचें देणें कमी केलें आहे.


# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठे महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

असतात, असें आढळून आलें आहे. प्रसिद्ध होणाऱ्या एकूण पुस्तकांपैकीं तीन चतुर्थांश पुस्तकें अवघ्या १० देशांत प्रसिद्ध करण्यांत येत असतात. दरवर्षी १०,००० हून अधिक पुस्तकें प्रसिद्ध करणारे देश फारच थोडे आहेत. पाऊण हिस्सा पुस्तकें भारत, रशिआ, जपान, अमेरिका इत्यादि १० देशांतून प्रसिद्ध करण्यांत येतात. पुस्तकांची किरकोळ विक्री करणाऱ्या निरनिराळ्या देशांतील दुकानांची संख्या अहवालांत एका कोष्टकांत देण्यांत आलेली आहे. ही यादी १६ देशांच्या पुरतीच मर्यादित आहे. कोष्टकावरून असें दिसून येतें कीं, किरकोळ विक्रीच्या बाबतींत रशिआचा अनुक्रम पहिला लागतो. रशिआंत किरकोळ विक्रीचीं २४,००० केंद्रें आहेत. त्यानंतर इटलींत ९,६०० केंद्रें आहेत. ब्रिटन व अमेरिका ह्या देशांतून अशा प्रकारचीं सुमारें ८,५०० केंद्रें आहेत.

## मुंबई राज्यांतील १४ सहकारी साखर कारखाने

मुंबई राज्यांतील पहिला सहकारी साखर कारखाना लोणी येथें डिसेंबर, १९५० मध्यें सुरू झाला. दुसरा कोपरगांव येथें ९ फेब्रुवारी १९५६ रोजीं सुरू झाला. खालील सहकारी कारखान्यांसाठीं यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे व ते कारखाने येत्या मोसमांत साखर उत्पादन करूं लागतील, अशी अपेक्षा आहे.

१ श्री. खेडूत सहकारी खंड उद्योग मंडळी लि., बाबेन (सुरत).

२ राहुरी सहकारी साखर कारखाना लि., राहुरी (अहमदनगर)

३ कारेगांव सहकारी साखर कारखाना लि., कारेगांव (अहमदनगर).

४ श्रीराम सहकारी साखर कारखाना लि. फलटण (सातारा).

५ मालेगांव सहकारी साखर कारखाना लि. बारामती (पुणें).

६ रहाता सहकारी साखर कारखाना लि. रहाता (अहमदनगर).

आणखी सहा साखर कारखान्यांसाठीं यंत्रसामुग्री लवकरच मागविण्यांत येईल. एकूण १४ कारखान्यांपैकीं प्रत्येकानें भागीदारांकडून खालीलप्रमाणें भाग भांडवल जमा केलेलें आहे. येत्या पांच वर्षांत आणखी ५ साखर कारखाने काढण्याचा विचार आहे.

(आकडे ३१ मार्च, १९५६ अखेरचे)

| | रुपये |
|---|---|
| प्रवरा | १८,७९,२५८ |
| कोपरगांव | १७,३७,५०४ |
| बाबेन | १५,०६,००० |
| राहुरी | ९,३८,५७१ |
| कारेगांव | १०,२७,८३० |
| फलटण | १०,००,०५० |
| मालेगांव (बारामती) | १०,१२,०९५ |
| रहाता | १०,११,३०० |
| इचलकरंजी | १०,२०,३०५ |
| कडोली | १०,०५,२२४ |
| घोटवडे | १०,०८,१०० |
| सणसर | १०,२०,०१० |
| जुळेवाडी | १०,००,००० |
| मालेगांव (नाशिक) | १०,२८,२६१ |

ह्याखेरीज, प्रत्येक कारखान्याचे १० लक्ष रुपयांचे भाग सरकारनें घेतले आहेत. कारखाना उभारणीसाठीं लागणारा बाकीचा पैसा इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून कर्जाऊ घेतला जाईल.

उद्बोधक उद्गार

## परदेशांतील सहकारी चळवळ

"भारतांतील सहकारी संस्थांची घटना, कार्यपद्धति व प्रत्यक्ष कारभार ह्यांबद्दल इतर देशांना पुष्कळच जिज्ञासा आहे. आपण भारतांत सरकारवर फारच अवलंबून राहतों. इतर देशांतील सहकारी संस्थांना सरकारी हस्तक्षेपाची भीति वाटत नाहीं, किंवा सरकारी मदतीची त्या अपेक्षाहि करीत नाहींत. इतर देशांतील सहकारी संस्था आपला व्यवहार वाढविण्यास व कार्यक्षमतेनें कारभार करण्यास विशेष उत्सुक असतात." :—प्रो. द. गो. कर्वे ह्यांनीं, बॉंबे स्टेट को. बॅंकेंत सत्कार-समारंभाचे वेळीं केलेलें भाषण.

## मुंबई शहरासाठीं ट्यूब रेल्वेची योजना

मुंबई शहरांत भूमिगत रेल्वेची ६२ कोटी रुपयांची योजना आंखण्यांत आली आहे. बोरीबंदर ते म्यूझियम (बलार्ड एस्टेट व चर्चगेट द्वारा) हा फाटा प्रथम सुरू करावा, नंतर बोरीबंदर ते बॉंबे सेंट्रल हा फाटा हातीं घ्यावा, नंतर भायखळा व शीव हीं जोडावीं आणि बॉंबे सेंट्रल व माहीम हीं जोडावीं, अशी कल्पना आहे. खणून काढलेली माती–दगड, लॅंड रीक्लेमेशन योजनेप्रमाणें बॅकबेचा समुद्र भरून काढण्यासाठीं सरकारनें विकत घ्यावी म्हणजे ट्यूब रेल्वेच्या भांडवली खर्चात २५% बचत होईल, अशी सूचना करण्यांत आली आहे. सबंध योजनेची तज्ज्ञांकरवी तपासणी अद्याप व्हावयाची आहे. ट्यूब रेल्वेमध्यें एकच वर्ग राहील व रेल्वेचे दर बसच्या दरापेक्षा स्वस्त असतील.

## सिमेंटचा व्यापार सरकार करणार

सरकारमार्फत सिमेंटचा व्यापार करण्याचें व त्याचा दर सर्वत्र सारखा ठेवण्याचें भारत सरकारनें ठरविलें असून, या निर्णयाची अंमलबजावणी १ जुलै, १९५६ पासून सुरू झाली. उत्पादकांच्या विद्यमान विक्री यंत्रणांमार्फत स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (प्रा.) लि. सिमेंटची वांटणी करील. या कार्यासाठीं या यंत्रणांची कॉर्पोरेशनचे एजंट म्हणून नेमणूक करण्यांत येत आहे. १०२ रु. ८ आणे टन याच दरानें कॉर्पोरेशन सिमेंटची सर्वत्र विक्री करील.

## कंपनीची पाटी मराठींत हवीच !

कंपन्यांनीं आपल्या कचेरीच्या बाहेर आपल्या नांवाची जी पाटी लावावयाची असते, ती पूर्वीच्या कंपनी कायद्याप्रमाणें इंग्रजींत असावी लागे. नव्या कायद्याप्रमाणें, ही पाटी स्थानिक भाषेंत असावयास पाहिजे. म्हणजे, फक्त इंग्रजींत पाटी लावली व त्याबरोबर स्थानिक भाषेंत पाटी लावली नाहीं, तर कंपनी कायद्याचें पालन होणार नाहीं. कायद्यांतील ह्या फरकाकडे सर्व कंपन्यांचें लक्ष वेधण्यांत येत आहे.

**कण आणि क्षण**
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक :–श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

### जुनीं व आजचीं दैनिकें

" सार्वजनिक जीवनाशीं संबंधित असलेल्या साठी उलटलेल्या प्रत्येक व्यक्तीला फार तर १०,००० पर्यंत विक्री असलेल्या व दारिद्र्याशीं झुंज देणाऱ्या वृत्तपत्राचा किती प्रभाव होता, याची जाणीव असेल. परंतु, आतां एक लाख प्रति छापून अधिक खप असल्यामुळें जाहिरातींची मागणी करणाऱ्या आजच्या दैनिकाला त्या जुन्या दैनिकांची सर येणें कठीण आहे. सरकार अथवा अल्पसंख्य व प्रभाव नसलेल्या त्यांच्या विरोधकांविरुद्ध लिहिण्याची या वृत्तपत्रांची संवयच नाहींशी झालेली आहे. सुशासनासाठी जनमत तयार करण्याचें वृत्तपत्रांचें कर्तव्य लोकशाहीच्या यशस्वितेसाठी त्यांनीं पार पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "

—श्री. राजगोपालाचारी ह्यांचा लेख.

### रशियाची शास्त्रीय प्रगति

" शास्त्रीय क्षेत्रांत रशिया लवकरच ग्रेटब्रिटन व युनायटेड स्टेट्स ह्यांना मागें सारील. आज तो ह्या देशांच्या साधारण बरोबरच आहे. संशोधनांत गुंतलेले १० शास्त्रज्ञ रशियांत असले, तर अमेरिकेंत ४ व ब्रिटनमध्यें फक्त १ असे आढळतील. रशियाला पुढें जाऊं द्यावयाचें नसेल, तर पाश्चात्य देशांनीं शास्त्रज्ञांच्या संख्येंत त्वरेनें वाढ केली पाहिजे " :—प्रोफेसर मार्कस ऑलिफंट [ ऑस्ट्रेलियन अणुशास्त्रज्ञ, ऑस्ट्रेलियन नॅशनल विद्यापीठांतील रिसर्च स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेसचे डायरेक्टर ]

### नवीन कर्जरोख्यांच्या खरेदीसाठी सवलतीची योजना

भारत सरकारच्या नवीन कर्जरोख्यांचे खरेदीसाठी दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., नें आपले खातेदारांकरितां एक सवलतीची योजना आखली आहे. त्यामुळें अगदीं सामान्य व्यक्तीला सुद्धां कर्जरोखे खरेदी करतां येऊन सरकारच्या पंचवार्षिक योजनेस यथाशक्ति हातभार लावता येईल.

### कोटेलवाला इंग्लंडमध्यें स्थायिक होणार?

सीलोनचे भूतपूर्व पंतप्रधान, सर जॉन कोटेलवाला, हे सध्या इंग्लंडमध्यें मनोवेदन करीत आहेत. ते तेथील केंट परगण्यांत १० एकरांची एक इस्टेट खरेदी करण्याच्या विचारांत आहेत. इकडे सीलोन प्रजासत्तक बनण्याच्या मार्गावर असतांना त्याचे भूतपूर्व पंतप्रधान खुद्द इंग्लंडच्या राणीच्या राज्यांतच स्थाइक होण्यांत आनंद मानणार, असें दिसतें.

**भारतासाठी चीनचा तांदूळ**—चीनकडून २ लाख टन तांदूळ विकत घेण्याच्या वाटाघाटी भारतीय सरकार करीत आहे. सयामकडूनहि कांहीं तांदूळ विकत घेण्याचा सरकारचा विचार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ४० लाख टन गहूंहि भारतीय सरकार आयात करणार आहे. त्यांपैकी बहुतेक गहूं अमेरिकेकडून घेण्यांत येईल.

**पॉवर अल्कोहलचा कारखाना**—श्रीरामपूर येथून एक मैलावर असलेल्या शिसगांवच्या जवळ सरकारी मालकीचा पॉवर अल्कोहलचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी १०० एकरांच्या जागेची निवड करण्यांत आली आहे. श्रीरामपूर आणि कोरेगांव तालुक्यांतील साखरेच्या कारखान्यांत निर्माण होणाऱ्या मळीचा उपयोग अल्कोहलच्या उत्पादनासाठी करण्यांत येणार आहे.

**लँड मॉर्टगेज बँकेची स्थापना**—गुजरातमधील लँड मॉर्टगेज बँकांच्या प्रतिनिधींची एक बैठक बडोदा येथें भरली होती. ह्या बैठकींत गुजरातसाठी मध्यवर्ती सेंट्रल लँड मॉर्टगेज बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला. बँकेचें भांडवल १० लाख रुपयें असेल. संस्थेची घटना तयार करण्यासाठी कमिटी नेमण्यांत आली आहे.

**रशिआची व्यापारी कचेरी**—कैरो येथें रशिआनें आपली व्यापारी कचेरी उघडण्याचें ठरविलें आहे. ह्याबाबत उभय राष्ट्रांच्या दरम्यान करारहि करण्यांत आला आहे. रशिआ व इजिप्त ह्यांच्यामधील व्यापारी संबंध दृढ करण्यासाठी व इजिप्तमधील रशिआच्या व्यापाराकडे लक्ष देण्यासाठीं कचेरी उघडण्यांत आली आहे.

**साधूंची परीक्षा होणार**—भारत साधु-समाज ह्या संस्थेचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या साधूंची परीक्षा करण्यासाठीं कीर्तिवंत व सच्चरित अशा साधूंची एक कमिटी स्थापन करण्यांत आली आहे. साधु ह्या नांवानें मिरविणाऱ्या ढोंगी लोकांचा प्रवेश समाजांत होऊं नये म्हणून ही दक्षता घेण्यांत येत आहे.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

या बँकेच्या सन १९५६-५७ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा-कचेऱ्यांच्या नोटीसबोर्डावर निवडणुकीचे नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांची नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराचे लेखी संमतीनें शुक्रवार दिनांक १०-८-१९५६ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वीं बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवून द्यावीत.

सदर बाबतींत जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या कामाच्या वेळांत मिळूं शकेल.

पुणें शहर, दि. ११-७-१९५६

वा. ग. अळतेकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९५६-५७ च्या हिशेबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेंत दोन हिशेबतपासनिसांची नेमणूक करावयाची आहे.

सदर जागांसाठी ज्यास उमेदवार म्हणून उभें रहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत मंगळवार दिनांक ३१-७-१९५६ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वीं पोंचतील अशा बेतानें पाठवून द्यावेत.

उमेदवारानें सदर अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व शैक्षणिक लायकीहि नमूद केली पाहिजेत.

हिशेबतपासनिसांच्या नेमणुकीबाबतचे बँकेनें केलेले नियम बँकेच्या मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर दि. ११-७-१९५६

वा. ग. अळतेकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

## क्लिअरिंग हाऊसेसमधील चेक क्लिअरन्स

भारतांतील क्लिअरिंग हाऊसेसपैकी मुंबईमधील क्लिअरिंग हाउसचें काम किती मोठें आहे, त्याचे खालोखाल कलकत्ता, मद्रास, दिल्ली, बंगलोर आणि कानपूर हीं कशीं येतात व बाकीचीं क्लिअरिंग हाऊसेस किती लहान आहेत, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल:—

| केंद्र | १९५३ | | १९५४ | | १९५५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चेक्सची संख्या | रक्कम (लक्ष रु.) | चेक्सची संख्या | रक्कम (लक्ष रु.) | चेक्सची संख्या | रक्कम (लक्ष रु.) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| बंगलोर | ८,११,३०२ | ८९,२५ | ८,५९,०५५ | ९४,४८ | ९,१६,४०० | १०२,९४ |
| मुंबई | १,१४,८३,२१४ | २,६४५ ०५ | १,२४,५६,५०५ | २,७५८,७५ | १,३३,४४,९१२ | २,९९५,५३ |
| कलकत्ता | ७२,३१,७५८ | २,४९४,३६ | ७६,९४,६२४ | २,७५४,२८ | ८०,३५,४८५ | ३,०५६,३१ |
| दिल्ली | १८,१४,३६४ | १७३,२२ | २१,५६,३३७ | २०४,७० | २२,६१,७५१ | २३३,०३ |
| कानपूर | ८,१९,१५५ | १४६,४७ | ८,५६,६२८ | १४१,९० | ८,९५,७८९ | १४६,११ |
| मद्रास | ३५,८०,८४१ | ३९७,६३ | ३९,३७,९५० | ३६१,९४ | ४१,४५,८७३ | ४१२,२१ |
| इतर* | ५४,५८,३२२ | ६५४,२७ | ६१,१२,१५३ | ७४४,२१ | ६८,६२,९५३ | ८७२,८८ |
| एकूण | ३,११,९८,९५६ | ६,६०३,२५ | ३,४०,७३,३२२ | ७,०६४,२६ | ३,६४,६३,१६३ | ७,८१९,०१ |

* त्यांत खालील ठिकाणच्या क्लिअरिंग हाऊसेसचा समावेश आहे:—आग्रा, अलाहाबाद, अहमदाबाद, अल्लेप्पी, अमृतसर, बरेली, कोचीन, कोइमतूर, डेहराडून, गया, गोरखपूर, हैद्राबाद, जयपूर, जालंदर, काझीकोड, लखनौ, मंगलोर, मथुराई, मुझाफरपूर, नागपूर, न्यू दिल्ली, पाटणा, पुणें, राजकोट, सिमला आणि विजयवाडा.


**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, " અર્થ "
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

तमाम दंतरोगांवर
**★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★**

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**
**( शिड्यूल्ड बँक )**
**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विकीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८९, मेडोज स्ट्रीट, मुंबई १.
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.